## प्रतिक म्हात्रे

# पर्सनल-से सवाल



# पर्सनल-से सवाल

प्रतिक प्रवीण म्हात्रे,

ई साहित्य प्रतिष्ठान

# पर्सनल-से सवाल

**प्रतिक प्रवीण म्हात्रे,**
आगाशी, म्हात्रेवाडी, 'साई प्रतिक निवास',
पोस्ट ऑफिस समोर
विरार पश्चिम, तालुका /जिल्हा -पालघर
४०१३०१

मोबाईल - ८८८८१९८८५०
ईमेल - infopratikmhatre@gmail. com
पर्सनल ब्लॉग - www. pratikpravinmhatre. wordpress. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

**e**sahity@gmail. com

**e**Sahity Pratishthan

**e**leventh floor

**e**ternity

**e**astern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

App : https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity.

प्रकाशन : ३०/०७/२०१७



©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - नगी घेणे आवश्यकप्रतिष्ठानची परवा आहे.

## ' पर्सनल-से सवाल ' च्या निमित्ताने

आत्ताची पिढी मराठी कथा कादंबऱ्या वाचण्यापेक्षा इंग्रजी कादंबऱ्या वाचण्यावर जास्ती भर देते. लहानपणापासून इंग्रजी माध्यमात शिकल्यामुळे त्यांना मराठी वाचण्यात अनेक अडचणी येतात. त्यामुळे जर आपण आपल्या डोळयासमोर घडणाऱ्या, आपण अनुभवलेल्या अशा गोष्टी, ज्या माझ्या वयाच्या इतर मुलामुलींनी अनुभवलेल्या असतील, त्या गोष्टी, एखाद्या आर्टिकल च्या रुपात किंवा एखाद्या कवितेच्या रुपात जर सर्वांसमोर मांडल्या तर त्या वाचण्यासाठी आताची पिढी नक्कीच इंटरेस्ट घेईल हा विचार करून मी लेखनास प्रारंभ केला. माझे लेखन वाचल्यावर काही जणांनी मला माझा ब्लॉग चालू करण्यासाठी सुचवले. माझा ब्लॉग सुरू करण्याआधी माझा मित्र प्रो. प्रथमेश चुरी याने मला त्याच्या ब्लॉग वर माझी कविता प्रसिद्ध करण्याची संधी दिली आणि बऱ्याच जणांनी सपोर्ट केल्यानंतर wordpress वर मी माझा स्वतःचा ब्लॉग सुरू केला. ब्लॉगमुळे माझे लेखन अनेक जणांपर्यंत पोहोचले आणि त्यांच्याकडून येणाऱ्या प्रतिसादाचा, सल्ल्याचा मला नेहमीच उपयोग झाला. पुण्याच्या कलापनी संस्थेच्या डॉ. अनंत परांजपे यांनी मला वेळोवेळी मार्गदर्शन केले. आणि त्यांच्या मार्गदर्शनामुळेच पुण्याच्या कवी संमेलनामध्ये कविता सादर करण्याची संधी मला मिळाली.

याशिवाय माझे विद्यालंकार कॉलेज मधील माझे मित्रमैत्रिणी आणि माझे इतर मित्रमैत्रिणी यांनी मला नेहमीच सपोर्ट केला आहे. जितकी नावे घेईन तितकी थोडीच आहेत. त्या सर्वांचे मनापासून धन्यवाद.

याशिवाय अजून एक नाव मी आवर्जून घेईन ते म्हणजे साधना कस्पटे. माझ्या प्रत्येक आर्टिकल मध्ये ती मला नेहमीच मार्गदर्शन करत असते.

तुम्हां सगळ्या वाचकांचे सुद्धा मनापासून आभार. मी माझ्या सर्व कवितांचे आणि लेखांचे एक पुस्तक बनवावे असे मला अनेक जणांनी सुचवले होते. आणि आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या मदतीने हे पुस्तक तुम्हाला भेट म्हणून देताना मला खूप आनंद होत आहे. आपण त्याचा स्वीकार करावा ही नम्र विनंती.

**प्रतिक प्रवीण म्हात्रे**

# अनुक्रम


1. शाळेत गेलेल्या प्रत्येकासाठी
2. Four years of Engineering life
3. ती सध्या काय करते…
4. गॅलरीतला पाऊस
5. पहिला पाऊस
6. Don’t mix personal and professional life
7. आयुष्य असंच जगायचं असतं
8. “No reply… means ?? “
9. Social Networking
10. मानसिकता
11. स्त्री आहेस तू…
12. लोक काय म्हणतील ????
13. सगळं तसंच आहे अजून
14. Friendship vs Relationship
15. Friendship vs Relationship
16. मैत्री
17. Feeling ________
18. कोंडी…
19. आयुष्य…
20. लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी…
21. लहानपण देगा देवा .. .
22. EGO

अर्पणपत्रिका

ज्यांनी मला माझे विचार शब्दांत मांडण्यासाठी ,

मला व्यक्त होण्यासाठी प्रवृत्त केले

त्या माझ्या हितचिंतकांना अर्पण..

--प्रतिक

# शाळेत गेलेल्या प्रत्येकासाठी

शाळा संपल्यावरचं कळते
खरी गंमत काय असते
पहिल्या आणि शेवटच्या दिवशीच्या रडण्यात
आपले जगलेले जीवन असते

अनोळखी चेहरे नंतर जिव्हाळयाचे होतात
काही नाती आयुष्यभरासाठी मिळून जातात
खेळण्यांसाठी होणाऱ्या भांडणातूनच
मैत्रीचे संबंध वाढत जातात

सुट्ट्यांची आम्ही अगदी आतुरतेने वाट पाहत असतो
महिनाअखेर, श्रावणी सोमवार का असेना...
Half day मध्ये सुद्धा आम्ही समाधानी असतो

कॉलेजला रिकामे असणारे first bench
शाळेत मात्र नेहमी भरलेले असतात
पहिल्या bench वर कोण बसणार
यासाठी सुद्धा स्पर्धा लागतात

मित्रांचा डबा चोरून खाण्यातच तर खरी गंमत असते
मधल्या सुट्टीत डबा खाण्यापेक्षा
आपल्याला ग्राउंड वर जाण्याचीच
जास्त घाई असते

संध्याकाळी क्रिकेट खेळल्यानंतर
अभ्यास करायचा मूड कुठे असतो
नेहमीच्या अपूर्ण गृहापाठमुळे
हातावर छडीचा वळ असतो

मुलामुलींच्या जोड्या लावणं
हे आमचं खूप आवडीचं काम असतं
पण आपल्याला जर कोणी चिडवलं
तर मात्र आम्हाला कधीच ऐकून घ्यायचं नसतं

प्रत्येक off period ला आमचा
PT साठी आरडाओरडा असतो
बाहेर पाऊस पडत असेल
तर वर्गात बेंचवर पेन फाईट खेळण्यातसुद्धा
आम्ही समाधानी असतो

एरवी दंगा करणारे आम्ही
रिझल्टच्या दिवशी मात्र एकदम शांत असतो
कधी देवळात न जाणारे आम्ही
त्या दिवशी मात्र
देवा ! फर्स्ट क्लास मिळू दे रे
एवढंच विनवत असतो

आता मात्र गेले ते दिवस, उरल्या त्या फक्त आठवणी
अस म्हणण्या शिवाय दुसरं काही उरलं नाही
आता आपलं ते School Life संपलं,
फक्त आठवणीत रमण्याशिवाय पर्याय नाही

# Four years of Engineering life




“Hello… . ”

“Hi… ”

“What’s your name ?”

“सारंग.. ”

“मी आकाश… कोणत्या ब्रँच ला आहेस ??”

“EXTC…  तू ?”

“मी पण… OHU आहेस?”

“नाही.. मी मुंबई मध्येच राहतो.. तू OHU आहेस का ??”
“हो.. मी नाशिकचा.. दादर ला हॉस्टेल वर राहतो… ”

हे संभाषण बऱ्याच जणांच्या परिचयाचं असेल.. आपल्या इंजिनीरिंगच्या पहिल्या दिवसाची सुरुवात हि काहीशी अशीच होते. आधीच एवढ्या मोठ्या कॉलेज मध्ये एकटे आल्यामुळे आपण थोडेसे घाबरलेले असतो आणि त्यात जर तुम्ही तुमचं घर सोडून शिक्षणासाठी लांब आला असाल मग तर काही विचारायलाच नको.. अशा वेळी आपली नजर नकळतपणे आपल्या सारख्याच कोणाला तरी शोधत असते.. आणि जर तसं कोणी भेटलं तर मग मनावरचं बरंचसं ओझं कमी होऊन जातं.

थोडे दिवस गेले की मग हळू हळू आपण समोरच्याला समजायला लागतो.. आवडी निवडी जुळल्या कि मग आपोआप आपला एक ग्रुप बनतो.. आणि एकदा का ग्रुप बनला कि मग काय… दिवस कसे भुर्रकन निघून जातात आपल्याला कळत सुद्धा नाही.. लेक्चर बंक करून क्रिकेट खेळणं, फिरायला जाणं, पिक्चरला बघणं.. असं सगळं सुरु होतं.. मग त्या ग्रुप मध्ये कोणतरी लैला/मजनु तयार होतो. त्याची सेटिंग लावण्यासाठी अख्खा ग्रुप मेहेनत घेतो.. कधी तरी यश पदरी पडतं… नाही तर मग फक्त friendship वरचं समाधान मानाव लागतं.

ग्रुप स्टडी च्या नावाखाली नाईट मारल्या जातात.. ग्रुप मधला कोणी जर एकटाच रूम वर राहत असेल तर नाईट मारायला ते एक हक्काचं ठिकाणचं असतं. फेस्ट चे ते तीन चार दिवस तर एकदम धमाल असते. DJ नाईट ला तर आपण वेड्यासारखे नाचतो. अगदीच जर नाचता येत नसेल तर गणपती डान्स असतोच…




Viva ला तर आपला अपमान हा ठरलेलाच असतो. कितीही अभ्यास करून गेलं तरी external जे प्रश्न विचारेल त्याची उत्तर आपल्याला कधीच देता येत नाही. Semester exam साठी कितीही दिवस सुट्टी असली तरीसुद्धा अभ्यास मात्र शेवटच्या रात्रीच होतो.. (काही अपवाद वगळता). शेवटचा पेपर संपायच्या आधी

आपले vacation चे प्लॅन्स रेडी असतात.

Last year ला सर्वात जास्ती बंक होतात ती प्रोजेक्ट्स च्या नावावर.. संपूर्ण एक वर्ष वेळ दिलेला असतो प्रोजेक्ट पूर्ण करण्यासाठी.. पण डेडलाईन कधीच न पाळणारे आपण तो शेवटच्या काही महिन्यातच सुरु करतो.

सुरुवातीला सगळे जण 'कशी संपणार हि चार वर्षे… ' असाच विचार करत होते पण आता जेव्हा संपायला आली तेव्हा वाटतंय कि हि चार वर्षे एवढ्या लवकर नव्हती संपायला पाहिजे… कॉलेज संपलं.. सगळ्यांना पुन्हा रोजच्या सारखं भेटता येणार नाही.. ज्या आठवणी आहेत त्या आठवणी सोबत घेऊन पुढे जायचंय..

आता कोण आमचा पाय खेचणार, कोण आम्हाला फालतूचे सल्ले देणार… कोण नेहमी आमच्या बाजूने उभे राहणार… कोण आता आम्हाला नवीन नवीन नावे पाडणार… आता कोण आमच्याशी कारण नसताना भांडणार… कोणाशी आम्ही वायफळ चर्चा करणार…

कोण आम्हाला अपयश आल्यावर दिलासा देणार… चुकून जास्त मार्क्स मिळल्यावर कोण शिव्या घालणार… कोण आता आमचा टिफिन संपवणार…


असे मित्र पुन्हा कुठे भेटणार जे नेहमी आपलीच खेचायचे पण जर दुसरा कोणी आपल्याला काही बोलला तर लगेच आपल्या बाजूने उभे राहायचे… कोण आता आम्ही कोणत्या मुलीशी किंवा मुलाशी बोललो तर आम्हाला चिडवून चिडवून त्रास देणार.. कोण आता आम्हाला मागून हाक मारून समोर बघ रे.. असं सांगणार…

…

कोण आता फिरायला जाण्यासाठी एका पायावर तयार होणार…

लोकांच्या दृष्टीने आमचे कॉलेज चे दिवस संपले जरी असले… तरी या कॉलेज शी आणि कॉलेजच्या friends शी आमची नाळ जुळलेली आहे… आणि ती तशीच कायम राहील.. आमच्यातलं कोणी परदेशी जाईल, काही जणांची लवकर लग्न सुद्धा

होतील.. पण इतक्या वर्षाच्या ज्या आठवणी आहेत त्या कधीच पुसता येणार नाहीत.... .




# ती सध्या काय करते...

पहिली भेट झाली ती दुसरीच्या वर्गामध्ये
वाढत गेली मैत्री डबे, पुस्तकं शेअर करण्यामध्ये
आता उत्सुकता मात्र एकचं असते
ती सध्या काय करते... ..

एकमेकांकडे चोरून बघण्यात
मैत्रीची (कि प्रेमाची) एक भावना असायची
खेळताना कुठे धडपडलो
तर पहिली काळजी तिला असायची
आता उत्सुकता मात्र... .... .

शाळेच्या दिवसात प्रेम म्हणजे काय
हेच माहीत नव्हते
जेव्हा माहित झाले तेव्हा
आमच्यातले संबंध एवढे चांगले नव्हते
आता उत्सुकता मात्र... ...

या धावपळीच्या जीवनात
रस्त्यात कधी तरी भेटावं तिने
नेहमीची rachel mcadams सारखी स्माईल देऊन
ओळखलं का मला? विचारावं तिने
आता उत्सुकता मात्र एकचं असते
ती सध्या काय करते... ..


प्रवास...
का कुणास ठाऊक पण
आज जरा मन उदास झालंय
कॉलेजचे दिवस आता बोटांवर मोजण्याइतके राहिलेत
विचारानेच मन भरून आलंय
सुरुवातीला कॉलेज लवकर संपावं
म्हणून वाट पाहत होतो
आता मात्र हा प्रवास इतक्यातच का संपला
सदैव हाच विचार येतोय
येत्या काही दिवसातच
कोणी out of state असतील
तर कोणी out of india
सर्वांना मात्र नेहमीच आठवेल
Lectures ला खेळलेला mini militia
सर्वच बदलून जाईल आता
सवयीही बदलाव्या लागतील
जर lectures सारखं उशिरा गेलं
तर रोजंच ऑफिसमध्ये लेट मार्क्स लागतील
सुरुवातीचे काही दिवस मात्र
सर्वांची खूप आठवण येईल
आयुष्यातला एक सुंदर प्रवास संपला
याचं दुःख मनात बाळगूनचं
आयुष्याच्या पुढच्या प्रवासाची तयारी होईल
-प्रतिक प्रवीण म्हात्रे

# गॅलरीतला पाऊस...



तसा पावसात घराबाहेर पडायचा मला कंटाळाच.. अगदीच काही महत्वाचं काम असेल तरच काय ते बाहेर निघायचं. कारण कितीही मोठी छत्री, रेनकोट घालून गेलं तरी शेवटी भिजायचं ते भिजतोच आपण. छत्री घेऊन गेलं म्हणजे नुसती आपल्या मनाची समजूत.. जेव्हा



पहिला पाऊस येतो तेव्हा मात्र त्या पावसात भिजण्यात खूप गंमत असते.. वर्षाचे आठ नऊ महिने उन्हाच्या झळा सोसल्यावर आलेल्या पहिल्या पावसात चिंब भिजण्याची मजाच काही वेगळी असते. पण जसा पावसाचा जोर वाढत जातो तसा तो आपल्यासाठी किती महत्वाचा आहे, आपल्याला तो किती आवडतो अशा बाता मारणारे सुद्धा त्याला नंतर नावंचं ठेवतात.

आता हेच बघा ना... अगदी जून महिन्याच्या सुरुवातीला पावसाच्या प्रवासाची



बितंबातमी देणारे, पाऊस आल्यावर वातावरणात झालेला बदल अगदी रंगवून सांगणारे मीडिया वाले सुद्धा गेले दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे होणारी वाहतूककोंडी, रद्द झालेल्या लोकल ट्रेन्स, आणि ठप्प झालेले व्यवहार... याच बातम्या दाखवत आहेत.

म्हणूनच पावसाची मजा अनुभवण्यासाठी बाहेर पडण्यापेक्षा घरातच खिडकीत किंवा गॅलरीत बसून बाहेर धोधो कोसळणारा पाऊस बघणं मी नेहमीच पसंत करतो. पडत्या पावसात गरमागरम कॉफी पिण्याचा आनंद तो काय वर्णावा...



पावसाची अनेक रूपे बसल्या जागी आपल्याला अनुभवायला मिळतात. कधी फक्त हलकेच बारीक भुरभुरणारा, कधी सरळ उभा पडणाऱ्या पांढराशुभ्र जाडसर थेंबाचा, कधी

आडवा तिडवा धो धो कोसळणारा, तर कधी सरकत पुढे पुढे जाणाऱ्या तिरक्या धारांचा पाऊस.




पडत्या पावसातसुद्धा उंच झाडावर चिडीचूप बसून राहीलेले बगळे, मध्येच पंखांवरचा पाणी झटकून पिसे फुलवून घरट्यात दडून बसणाऱ्या चिमण्या, बुलबुल... एखाद्या प्रामाणिक पहारेकऱ्याप्रमाणे झाडाच्या फांदीवर बसून टेहळणी करणारा खंड्या (kingfisher)... आडोसा पकडून अंग फुलवून झोपी गेलेली मनी.. आणि पावसापासून बचाव करण्यासाठी कोणाच्या तरी टेरेस चा आसरा घेणारे कावळे... सर्वच जण आपापल्या परीने पाऊस एन्जॉय करत असतात.

लहान असताना जेव्हा खिडकीत बसायचो तेव्हा बाहेर कोसळणाऱ्या पावसाने खिडकीच्या काचा आतल्या बाजूने बाष्पामुळे धुरकट होत. त्याच्यावर बोटांनी रेघोट्या ओढायला फार मजा येई. त्या काचेवर आनंदी, दुःखी असे चेहरे काढायला नाहीतर आपली नाव लिहायला खूप भारी वाटायचं.. पावसाची जोराची झड खिडकीच्या आत आल्यावर उडणारे थंडगार तुषार मी दोन्ही हात पसरून

चेहऱ्यावर घेई. खिडकीसमोर एखादी तिरकी जाणारी वायर लटकलेली असे. त्यावरून हे पावसाचे थेंब एकमेकांशी स्पर्धा करीत धावत जात.



कधी कधी घराबाहेर न पडता घरातच बसून बाहेर बरसणाऱ्या त्या पावसाकडे पाहिलं तरी आपल्याला एक अवर्णनीय सुख अनुभवायला मिळतं.. या लेखाच्या निमित्ताने सभोवताली अनुभवायला मिळालेल्या सर्व गोष्टी शब्दांत मांडण्याचा प्रयत्न केला आहे.


पाऊस
कातळ नभ उतरू आलं
पहिल्या पावसात भिजून मन धुंद झालं
दरवळला सर्वत्र तो ओल्या मातीचा सुवास
मनालाही वाटलं काहितरी बेत बनवावा खास
मनाशी पक्कं ठरवून भर पावसात बाहेर पडलो
दाराबाहेर पाऊल टाकताच तिथेच अडखळलो
छपरावरून पावसाची टिपटीप सुरू झाली
बादल्या खाली मांडताना आम्हाला पळता भुई थोडी झाली
सर्व काही नीट करून मारली बाईक ला किक
थोडावेळ तिने सुद्धा भाव खाल्लामग झाली ठीक
एवढ्यात वाहत आली एक कागदाची होडी
तिला पाहताच क्षणात लहानपणाची आठवण झाली थोडी
पुढे एक ग्राउंड वर मुलांचा फुटबॉल रंगला होता
पाऊस कोसळतोय धो धो,पण त्यांना नाही फरक नव्हता
तेवढ्यात सुसाट बाईकवर, गेलं एक कपल
मग मात्र मनाची झाली, थोडीशी चलबिचल
अजून थोडं पुढे गेल्यावर दिसली, गरमागरम भजीची गाडी
पडत्या पावसात भजी खाण्याची मजा,मॅक डी च्या बर्गर मध्ये सुद्धा नाही
दुसऱ्या दिवशी पुन्हा ऑफिस होतं म्हणून तिथूनच टर्न घेतला होता
ग्रीष्माने तप्त धरणीस अलिंगन देण्यासाठी तो सुद्धा अवेळी आला होता
- प्रतिक प्रवीण म्हात्रे

# पहिला पाऊस

काल पहिला पाऊस आला
आणि क्षणात लहानपणीच्या
सगळ्या आठवणी समोर आल्या
तेव्हा केलेली मजा
आज पुन्हा एकदा कराविशी वाटली

ते पावसात फिरण
जोरात सायकल चालवण
मित्रांच्या अंगावर पाणी उडवण
साचलेल्या पाण्यात होड्या सोडण
फुटबॉल खेळण
पुन्हा एकदा करावस वाटल

जोरात पाऊस आला की
शाळेला दांडी मारायच
एक हक्काच कारण असायच
सर्दी खोकल्याची पर्वा न करता
पावसात भिजायच
याच आम्हाला भारी अप्रूप वाटायच

सगळीकडे पसरलेला मातीचा सुगंध
पावसात भिजलेल्या पक्षांची कीलबिल
आणि छत्री घेऊन फिरणारी लहान मुले
जणू पावसाची स्वागतच करत असायची

हाच पाऊस मात्र कधी अवेळी आला
की मात्र खुप राग यायचा
नुस्ता चिखल करुन जायचा
पावसाचा हा एक त्रास सोडला
तर मात्र हा नेहमी हवाहवासा वाटायचा

अगदीच पावसात नाही जाता आल
तरी सुद्धा घरात बसून
बाहेरचा पाऊस बघण्यातसुद्धा
फार गंमत वाटायची
लहानपणी केलेली मजा
आज पुन्हा एकदा कराविशी वाटली

# Don’t mix personal and professional life




आलोक.. सॉफ्टवेअर डेव्हलपर.. म्हणजे दिवसातले किमान १२-१४ तास काम करणं आलंच.. आलोक आणि मृण्मयी कॉलेजपासूनचे मित्र.. अगदी जवळचे.. best friends च म्हणूया ना.. पण डिग्री झाल्यावर मृण्मयीने MBA च्या तयारीसाठी गॅप घेतला आणि आलोक काही कारणास्तव एका नामवंत सॉफ्टवेअर कंपनी मध्ये नोकरीला लागला.. सुरुवातीचे काही दिवस जास्ती काही कामाचा भार नव्हता.. त्या मुळे सगळं काही पहिल्यासारखं सुरळीत चालू होतं. पण काही काळ गेल्यावर आलोकला कंपनीच्या कामासाठी परगावी जावं लागलं. आधीच नवीन जागा आणि त्यात कामाचं वाढतं प्रेशर यामुळे आलोकला नोकरी आणि स्वतः व्यतिरिक्त इतर

कोणत्या गोष्टींना फारसा वेळ देता येत नव्हता.. रात्री थकून घरी आल्यावर त्याला मोबाईल चेक करायला सुद्धा उसंत नव्हती.. कधी कधी तो तसाच उपाशीपोटी झोपून सकाळी नुसता कंपनीच्या बाहेर असलेल्या टपरीवरचा चहा पिऊन जॉबवर join व्हायचा.. या दरम्यान त्याचं आणि मृण्मयीचं contact कमी झालं.. ती रोज मेसेज करायची आणि हा दोन तीन दिवसांनी त्या मेसेजला रिप्लाय द्यायचा.. अर्थात त्याच्या अशा वागण्याने तिला राग येणं साहजिकच आहे म्हणा.. पण या कारणामुळे दोघांमध्ये असलेलं रिलेशन बिघडलं.. तो परत येई पर्यंत त्या दोघांमधली मैत्री जवळपास संपलीच होती.. मृण्मयी निघून गेली पण ती का गेली हा प्रश्न मात्र आलोकसाठी अनुत्तरीतचं राहिला…

आपलं आयुष्य म्हणजे अगदी ट्रेन सारखं झालं आहे.. कधी शताब्दीसारखं एकदम सुसाट.. म्हणजे चांगल्या किंवा वाईट गोष्टी इतक्या पटकन घडतात की त्या गोष्टींचा विचार करायला सुद्धा आपल्याला वेळ मिळत नाही.. तर कधी ट्रॅक तुटल्यामुळे बराच वेळ एकाच जागी थांबून राहिलेल्या लोकलसारखं… आपण त्या गोष्टीचा विचार न करण्याचा कितीही प्रयत्न केला तरी आपलं आयुष्य त्या एकाच क्षणावर थांबून राहतं.. आपण कितीही प्रयत्न केला तरी तेच तेच विचार आपल्याला मनात येत राहतात.

काही दिवस आधी एक विनोद आला होता.. की दहावी पर्यंत अभ्यास करा.. मग लाईफ एकदम मस्त आहे.. कॉलेज पूर्ण करा मग लाईफ एकदम मस्त आहे… पण खरं स्ट्रगल तर कॉलेज संपल्यावरचं सुरू होतं. आणि त्यातचं आपलं आयुष्य आपल्याला मार्गी लावायचं असतं. कॉलेजमध्ये असताना आपण विचार करत असलेलं आयुष्य आणि कॉलेज संपल्यावर आपल्या समोर उभं ठाकलेलं आयुष्य यात खूप अंतर आहे.

सांगायचा मुद्दा असा की आयुष्याच्या ज्या वळणावर आपल्याला कोणाच्या तरी सपोर्टची, कोणाच्या तरी आधाराची गरज असते त्याच वेळी अगदी लहानसहान कारणास्तव जर आपल्या जवळची व्यक्ती आपल्यापासून दूर गेली तर संपूर्ण गणितंच बदलून जातं. म्हणून कोणताही गैरसमज न करून घेता समोरच्याला समजून घेतलं तर दोघांचंही आयुष्य अगदी व्यवस्थित मार्गी लागू शकतं आणि मैत्रीही टिकून राहू शकते..

# आयुष्य असंच जगायचं असतं

आयुष्य असंच जगायचं असतं
आकाशात झेपावूनही जमिनीला विसरायचं नसतं,
संकटांना हसत हसत सामोरं जायचं असतं
आयुष्य असंच जगायचं असतं

दुःखात कधी रडत बसायचं नसतं
मलाच का निवडलं म्हणून नशिबाला दोष द्यायचा नसतो
आयुष्य असंच जगायचं असतं

सर्व गोष्टींमध्ये स्वतःला सिद्ध करायचं असतं
मार्ग नसेल तर आपण स्वतः बनवायचा असतो
आयुष्य असंच जगायचं असतं

जो पर्यंत स्वप्नपूर्ती होत नाही ,प्रयत्न सोडायचा नसतो
लोकांचा विचार न करता
आपल्या मनाला जे योग्य वाटेल तेच करायचं असतं
आयुष्य असंच जगायचं असतं

आयुष्यात कितीही कठीण प्रसंग आले
तरी त्यातून सावरून जिद्दीने पुन्हा उभं राहायच असतं
आयुष्य असंच जगायचं असतं

# “No reply… means ?? “




‘अरे यार… किती लेट रिप्लाय करतोय हा मुलगा… . अर्ध्या तासापासून ऑनलाइन आहे तरी सुद्धा माझा मेसेज दिसत नाही का याला??? की पाहून न पाहिल्या सारखं करत असेल… मेसेजला blue ticks पण येत नाहीयेत.. इतका कोणा बरोबर बोलत असेल?? की आता माझी जागा दुसऱ्या कोणीतरी घेतलीये.. त्या व्यक्तीला ताटकळत न ठेवता पटकन रिप्लाय करता यावा म्हणून हा माझे मेसेज बघत नसेल का?? पण इथे माझा संताप होतो त्याच काय??? त्याचं याला काही पडलेलं नाहीये… एक तर हा स्वतःहून कधी जास्ती मेसेज करत नाही आणि मी आधीच सगळं विसरून मेसेज केला तर याचे लेट रिप्लाय… वैताग आलाय मला आता… जाऊ दे… मी आता परत मेसेज करणारच नाही… . ’

आपल्यापैकी प्रत्येकाने ही द्विधा मनस्थिती नक्कीच अनुभवली असणार. आपण एखाद्या व्यक्तीला खूप importance देतो तेवढाच त्या व्यक्तीने सुद्धा आपल्याला द्यावा अशी आपली एक माफक अपेक्षा असते. आणि जर तसं झालं नाही की मग आपला मनस्ताप होतो… आता calling पेक्षा chattingच जास्त प्रमाणात होतं. कॉल वर बोलताना कधी अशी वेळ येत नाही कारण दोघेही फक्त परस्परांशीच बोलत असतात. पण जेव्हा आपण chatting करतो तेव्हा आपण आपली बाकीची सुद्धा कामं करत असतो..

हल्ली तर meetings सुद्धा व्हॅट्स अँप चा ग्रुप बनवून त्यावर होतात. आता ग्रुप म्हटला की वीस तीस मेंबर्स तरी असणार त्यात. आणि सगळे जण एकाच वेळी बोलत असतील तर मेसेज ची ही भली मोठी line लागते.. आणि त्यात जर का आपण दुसरी chat window उघडली तर त्या व्यक्तीला रिप्लाय करून पुन्हा ते ग्रुप chat उघडे पर्यंत त्या ग्रुप मध्ये किमान वीस तीस तरी मेसेज आलेले असतात. आणि मग परत ते एवढे मेसेज वाचेपर्यंत अजून मेसेज येतात..

आपण जेव्हा ड्राइविंग करत असतो तेव्हा आपण फक्त आलेले मेसेज चेक करतो. तेव्हा रिप्लाय करणं आपण शक्यतो टाळतो.. कारण एकदा रिप्लाय केला आणि मग नंतर मेसेज बघूनसुद्धा रिप्लाय नाही केला को समोरच्याला वाटत हा आपल्याला ignore करतोय.

बऱ्याचदा असं होतं की आपण अभ्यास करत असतो आणि आपल्या एखाद्या मित्राला कोणतं तरी उत्तर हवं असतं.. आता फोटो send करायला तर ऑनलाइन यावच लागणार ना.. तेव्हा सुद्धा ऑनलाइन येऊन मेसेज बघितला नाही म्हणून मग पुन्हा चिडचिड..

कधी कधी इंटरनेट सुद्धा आपले रंग दाखवतं. समोरच्याचे मेसेज आपल्याला येतात पण आपले मेसेज काही send होत नाही.. मग पुन्हा ऑनलाइन राहून रिप्लाय न केल्याचा ठपका..

काही जण सारखे सारखे ‘हा मेसेज दहा जणांना फॉरवर्ड करा मग हे होईल… ’ असेच मेसेज पाठवत असतात. आणि मग अशा माणसाने कधी कामाचा मेसेज केला की मग आपण तसलंच काही तरी सेंड केलं असेल असं समजून ignore करून टाकतो.

अशा या छोट्या छोट्या गोष्टींमुळे अनेकदा दोघांमधले संबंध ताणले जातात.. मग ती मैत्री असो वा प्रेम.. गैरसमज होतोच होतो.. या गैरसमजातून काही तरी टोकाचा विचार कारण्यापेक्षा समोरच्याला जर थोडा वेळ दिला तर कसलाही भडका उडणार नाही.. आता तुम्ही समोरच्यावर रागावणार आणि मग तुम्ही त्याची बाजू समजून घेत नाही म्हणून समोरचा तुमच्यावर रागावणार हे असं किती दिवस चालणार ना… . मग कधी तरी त्या गोष्टीला पूर्णविराम मिळतोच.. फक्त रिप्लाय लेट येतोय म्हणून त्या व्यक्तीच्या जीवनातलं आपलं महत्व कमी झालं असं वाटून घेण्यात काय अर्थ आहे..

# Social Networking

ऑर्कुट चा जमाना गेला मित्रा
आहे आता व्हाट्सअप फेसबुक
कॉम्पुटर वरचं बसतयं पोरगं
सोडून पॉकेमोन, जंगल बुक

कोणीतरी गेल्याची बातमी
व्हाट्सअप सर्वांना सांगतंय
घरी मुलगी आली की मुलगा
फेसबुकवरनं शेअर होतंय

लहान मुलं विचारतयं
काय काका तुम्ही व्हाट्सअप वर नाही
वयस्कर माणसं म्हणतायेत
आता मोबाईल शिकण्याशिवाय पर्याय नाही

यांना कोणीतरी काहीतरी फॉरवर्ड करतंय
मेसेज शेअरिंग चा यांना म्हणे टॉक टाइम मिळतोय
दहा लोकांना मेसेज पाठवून यांना देव प्रसन्न होतोय
जे मंदिरात जातात त्यांची मात्र अजून परीक्षाच बघतोय

सोशल नेटवर्किंग च्या निमित्ताने का होईना
आम्ही कनेक्टेड तरी राहतोय
डेटा पॅक परवडत नाही आता
म्हणून फ्री वायफाय शोधत फिरतोय

परदेशात असलेला मुलगा
मुलीचे फोटो स्क्रीनवर पाहतोय

Online कांदेपोहे कार्यक्रम उरकून

Amazon वर लग्नाची शॉपिंग करतोय

आता व्हाट्सअप वर पण videocall आलाय
सर्व पुरुष टेन्शन मध्ये असतील
बायकोचा फोन घेण्यापूर्वी
ऑफिस बॅकग्राऊंड शोधतील

सोशल होतोय आम्ही
पण किती याचं भान ठेवायला हवं
किमान वर्षातून एकदा तरी
आपल्या माणसांशी भेटून बोलायला हवं

# मानसिकता

“अरे कल्पेश.. लग्न ठरलं आणि सांगितलं सुद्धा नाहीस. आम्ही पार्टी मागू म्हणून घाबरलास कि काय ???”

“नाही रे, तसं काही नाही.. ”

“मग? काय झालंय? आणि तुझा चेहरा का असा पडलेला?”

प्रशांतच्या या प्रश्नाने कल्पेश विचारात हरवून गेला.

एक महिण्यापूर्वी कल्पेश आणि स्पृहाचं लग्न ठरलं होतं. खरं तर ते कल्पेशच्या घरच्यांनीच ठरवलं होतं. स्पृहा कल्पेश च्या आईच्या मैत्रिणीची मुलगी. दोघेही एकमेकांना लहानपणापासून ओळखत होते. त्यामुळे दोघांनाही लग्नाला लगेच होकार दिला. याच आनंदात त्यांच्या घरच्यांनी त्यांचा साखरपुडा उरकून घेतला. थोडे दिवस सुरळीत गेले आणि आणि मग त्या दोघांच्या आयुष्याला जणू ग्रहणचं लागलं.

कल्पेश आणि स्पृहा सिनेमा बघायला गेले होते. कल्पेशला सुट्टी मिळत नव्हती म्हणून त्याने रात्री उशिराच्या शो ची तिकीट काढली. आणि रात्री घरी येत असताना अचानक त्याची बाईक पंक्चर झाली. एवढ्या रात्री रिक्षा मिळणंही कठीण होतं. मग त्या दोघांनी चालतच घरी जायचं ठरवलं. जवळपास अर्धा तास चालले असतील आणि ते शहराच्या बाहेर पोचले. पुढचा गावपर्यंतचा रस्ता हा निर्जनचं होता. कोणी राहत नसल्याने त्या रस्त्यावर दारूडे,जुगारी यांचं राज्य असायचं. दोघेही चालत असताना स्पृहाला काही लोकं दारू पिताना आणि जुगार खेळताना दिसले. त्यातल्या एकाची आणि स्पृहाच्या एक क्षण नजरानजर झाली. स्पृहाने चटकन आपली नजर दुसरीकडे फिरवली आणि घाबरून तिने कल्पेशचा हात अजून घट्ट पकडला. कल्पेशने तिला धीर दिला. कल्पेशच्या त्या बोलण्याने

तिला जरा हायसं वाटलं. तिथून थोडे पुढे गेले असतील तोच त्यांना त्यांच्या मागून पावलांचा आवाज ऐकू आला. कोण आहे ते बघण्यासाठी कल्पेश वळणार एवढ्यातच त्याच्या डोक्यात कसलातरी जबरदस्त आघात झाला आणि तो खाली कोसळला. स्पृहाच्या तोंडून एक आर्त किंकाळी बाहेर पडली. एक मन तिला सांगत होतं कि पळून जा पण दुसरं मन कल्पेशला त्या अवस्थेत सोडून जायला तयार नव्हतं. आजूबाजूला असलेल्या माणसांच्या तोंडून मद्याचा उग्र दर्प येत होता. आता काय होणार हे लक्षात येऊन तिने गयावया करायला सुरवात केली. पण वासनेच्या भावनेने आंधळया झालेल्या त्या नराधमांना तिच्या त्या करुण विनवणीचं काहीच वाटत नव्हतं. तिच्या त्या आर्त किंकाळया त्याच्या कानांना अजिबात भिडत नव्हत्या. एखाद्या जखमी हरणावर तरसांचा कळप तुटून पडावा तसे ते त्या निरागस मुलीवर तुटून पडले.

तिच्या त्या विनवण्या,किंकाळया,स्वतःला वाचवण्यासाठीची तिची चाललेली केविलवाणी धडपड याने त्या राक्षसांना काहीच फरक पडत नव्हता. कल्पेश अर्धवट शुद्धीत काय चाललंय ते फक्त बघत होता पण त्याच्या अंगात बोलण्याचे किंवा उठण्याचेही त्राण शिल्लक नव्हते. आपल्या होणाऱ्या बायकोचे चाललेले हाल तो फक्त लाचार होऊन बघत होता.

प्रशांतच्या बोलण्याने तो पुन्हा भानावर आला आणि नजर लपवून म्हणाला ” आमचं लग्न मोडलं. ”

“काय!!!!”प्रशांतला जणू धक्काच बसला.

“हो… ”

“का? काय झाल?”

कल्पेशने घडला प्रकार त्याला सांगितला आणि प्रशांतच्या च्या आश्चर्याचा जणू पारावरच उरला नाही.

“लग्न कोणी मोडलं? तू कि स्पृहाने?

“माझ्या घरच्यांनी”
“आणि तू त्यांना तसं करू दिलंस? जे काही झालं त्यात स्पृहाची काय चूक होती?”
“हे मलाही माहित आहे रे कि तिची काही चूक नव्हती. पण घरचे म्हणतात कि अशी मुलगी सून म्हणून कशी आणणार घरी.. लोक काय म्हणतील!!!”
“लोकांच जाऊ दे रे.. लोक काय दहा तोंडांनी बोलणार. पण तू एक विचार कर कि जे काही झालं त्यात तुझी असमर्थता नाही आहे का? तू जर तुझ्या होणाऱ्या बायकोच रक्षण नाही करू शकत तर तुला लग्न करण्याचा काहीही अधिकार नाही आहे. समज जर लग्नानंतर तिच्यावर अशी वेळ आली असती तर तू तिला असंच सोडून दिलं असतास?? तू तिथे असूनसुध्दा त्यांच्या तावडीतून तिला वाचवू शकला नाहीस आणि मग घरच्यांच ऐकून तू लग्न मोडून मोकळा झालास… हा तुझा निर्णय नाही तर तू शोधलेली हि पळवाट आहे.. सगळा दोष तिच्या नशिबाला देऊन तू मोकळा झालास. या बद्दल पहिले विचार कर आणि मगच परत लग्न करण्याचा विचार कर. ”
कल्पेशच्या मनात विचारांच वादळ उठवून प्रशांत तिथून निघून गेला. त्याला त्याच्या निर्णयावर पुनर्विचार करावा असं वाटू लागल. प्रशांतच्या बोलण्यामुळे आपण करत असलेल्या चुकीची त्याला जाणीव झाली.
कल्पेश जो निर्णय घेईल तो घेईल.
पण आज खरच आपल्याला प्रशांतसारखा विचार करण्याची गरज आहे. आपला समाज अजूनही प्रतिगामी विचारांमध्ये अडकला आहे त्याला बाहेर काढण्याची गरज आहे आणि त्या साठी आपल्यालाच प्रयत्न करणं गरजेचं आहे.

(वरील कथा पूर्णपणे काल्पनिक असून त्याचा वास्तवाशी काही संबंध नाही आणि जर आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा. )

# स्त्री आहेस तू...

स्त्री आहेस तू
म्हणून स्वतःला कमी समजू नकोस... .

दुःखातही तू एकटे सोडत नाहीस
परिणामांचा विचार केल्याशिवाय तुझे पाऊल कधी उचलत नाहीस
आशावादी सुद्धा तूच बनवतेस
जगण्याची दिशा हि तूच दाखवतेस

तू पंतप्रधान होऊ शकतेस
आणि अंतराळवीरही
तू घरही सांभाळू शकतेस
आणि देशही

स्त्री आहेस तू
म्हणून अत्याचार सहन करू नकोस
कोणी जर त्रास दिला
तर त्याच्या कानाखाली आवाज काढायलासुद्धा
मागे पुढे बघू नकोस

संसार हा तुझ्याविना नेहमीच कोलमडून पडतो
तू नसशील तर आयुष्याला अर्थ नसतो
घराला घरपण असण्याचं कारणहि तूच आहेस
प्रत्येक पुरुषाची खरी ताकदही तूच आहेस

तुझ्यामुळेच तर घडले किती तरी युगपुरुष
पाठीशी होतीस म्हणून तर झाले हे स्वराज्याचे स्वप्नं साकार

तुझेच तर आहे या जगात अनन्यसाधारण महत्व
कारण तूच तर घडवतेस देऊन या जीवनाला आकार

जगण्याची उमेदही तूच आहेस
स्फूर्ती हि तूच
या जगातल्या चांगुलपणाचं
एक कारण हि तूच

तू भावनांनी भरलेलं भांडार आहेस
स्वतःसाठी नाही पण दुसऱ्यांसाठी संसार आहेस
तुझ्याकडून मिळणारा जीवनाचा आधार आहे
तुझ्याविना या जीवनात फक्त अंधार आहे
स्त्री आहेस तू
म्हणून स्वतः ला कमी समजू नकोस
नारीशक्ती हि पुरुषाच्या यशाचं कारण आहे
हे कधीही विसरू नकोस

# लोक काय म्हणतील ????



एखादी मुलगी किंवा मुलगा , एवढ्या रात्री, म्हणजे बारा वाजल्यानंतरसुद्धा ती किंवा तो online का आहे ? मोठ्ठा प्रश्न… तिचं कोणाबरोबर अफेअर चालू आहे का? ती कोणाशी बोलतेय एवढं… … . असे अनेक प्रश्न.. एखादी मुलगी वेस्टर्न style चे कपडे घालून बाहेर पडली… . तर… हिच्या घरच्यांचा हिला काही धाक नाही का?? बाहेर वावरताना कसे कपडे घालावे इतकं साधं कळत नाही तिला… एवढंच नाही.. मी तर असं एका वृद्ध जोडप्याकडून असं

हि ऐकलं होतं की मुली इतके छोटे कपडे घालतील तर बलात्कार होणारचं... कपड्यांचा आणि बलात्काराचा काय संबंध... साडी किंवा ड्रेस घातलेल्या मुलींवर सुद्धा बलात्कार होतातच ना... हा दोष जसा मुलींचा नाही तसाच मुलांचा सुद्धा नाहीये... मागेच एकदा माझ्या वाचनात असं आलं होतं की बलात्काराच्या आरोपात दोषी आढळलेल्या एका अल्पवयीन मुलाला एका पत्रकाराने विचारलं असता त्याने जे उत्तर दिलं ते अगदीच धक्कादायक होतं.. “मी काय चुकीचं केलं हेच मला माहित नाही... मी जे बघितलं ते मला करून बघायचं होतं... . त्याची मला एवढी मोठी शिक्षा मिळेल हे मला माहीतच नव्हतं”.. थोडक्यात काय तर काही तरी चुकीच बघून, वाचून भलतच काहीतरी घडण्यापेक्षा त्यांच्या पालकांनी त्यांना योग्य वयात सर्व गोष्टींची जाणीव करून दिली तर त्यांच्या कडून अशा चुका होणार नाहीत...

जर एखाद्या मुलाने मुलीसोबत किंवा मुलीने मुलासोबत फोटो टाकला तर त्या वरून किती issues... .. लोक काय म्हणतील ?? तुमचं लग्न ठरायला प्रॉब्लेम होईल... पण आताचा काळचं तसा आहे की जर एखादी मुलगी तुमची friend असेल तर तसंच एखादा मुलगा तुमचा friend असू शकत नाही का?? मुलाबरोबर फक्त नवरा किंवा boyfriend एवढंच नातं असतं का ?? ग्रुप म्हटला कि त्यात मुलं मुली ह्या आल्याचं ना... आणि तुम्ही हे विसरता कि जेव्हा तुमच्या मुलांना त्यांच्या अभ्यासात काही अडचणी येतात किंवा कोणती assignment पुर्ण करायची असेल तेव्हा या मुलीच त्यांना मदत करतात.. काळानुसार आपण आपले विचार सुद्धा

बदलायला हवेत.. जर जुन्या काळाप्रमाणे चालायचं ठरवलं तर मग बालविवाहाची प्रथा सुद्धा सुरु करावी लागेल…

मित्रांसोबत बाहेर फिरायला चालला आहेस ?? काय घेऊ वगैरे नको… कोल्ड ड्रिंक मध्ये काहीतरी मिक्स करून देतील.. मित्र चांगले नसतात… वाईट सवयी लावतात.. bla… bla.. bla.. आपला मुलगा बिघडला कि घरचे सरळ मित्रांच्या नावाने बिल फाडून मोकळे होतात… पण त्यांना हे माहित नसते… कि गंगाधरच शक्तीमान आहे… मुळात कोणतेही आई वडील त्यांच्या मुलावर किंवा मुलीवर कधी वाईट संस्कार करत नाही.. फक्त अवास्तव काळजीमुळे आपल्याला मुलाला किंवा मुलीला जास्ती बंधनात ठेवण्यात सुद्धा काही अर्थ नाहीये… काळानुसार बदल हा हवाच… तुम्ही तुमच्या शाळा कॉलेज च्या दिवसात त्या गोष्टी करत नव्हतात म्हणून तुमच्या मुलामुलींनीही त्या करू नये असा अट्टाहास का ?? तेव्हाचा काळ वेगळा होता, लोकांची मानसिकता वेगळी होती … आता ती बदलत आहेत तर आपण सुद्धा त्या बदलाचा एक भाग व्हायला हवं…

# सगळं तसंच आहे अजून

सगळे म्हणतात
मोठे झालात तुम्ही
पण फक्त गोष्टी बदलल्या आहेत
बाकी काही नाही

अजूनही मातीतच खेळतो आम्ही
फक्त खेळ बदलले,जागा नाही
आधी लंगड़ी, बॅटबॉल
आता बास्केट बॉल,फुटबॉल

शाळेची जागा कॉलेज ने घेतली
यूनिफ़ॉर्म च्या जागी t-shirt जीन्स आली
कंपासपेटीची जागा एका पेनाने घेतली
टिफ़िन ची जागा कॅन्टीन ने

मित्र बदलले,priorities बदलल्या
भावना अजूनही त्याच आहेत
पूर्वी शाळेत व्यायाम करायला कंटाळा करायचो
आता जिम मध्ये जाण आम्हाला भारी वाटत

आई,बाबांच्या जागी mom dad आले
पण माणसं अजूनही तीच आहेत
काळजी ही त्यांना पहिल्या इतकीच् आहे
फक्त त्यांनी ती दाखवणं कमी केलय

वय वीस वर्ष झाल
तरी अजुन सवयी मात्र त्याच आहेत
कोण म्हणतं मोठे झालो
लहानच आहोत आम्ही अजुन
पण फक्त गोष्टी बदलल्या आहेत
बाकी काही नाही

# Friendship vs Relationship




"अमोल… .. "

" हं… . बोल ना… . "

"तुला काही तरी सांगायचंय… . "

"बोला मॅडम… . परवानगी कधी पासून घ्यायला लागलात… "

" I am not single anymore… "

" अरे वाह… . finally कोणी तरी आवडलं तुला.. Congratulations.. happy for u "

“Thank you so much… .        ”

“Bdw… . कोण आहे तो lucky champ… ”

” धवल… माझ्याच स्कूल मध्ये होता… तेव्हा मला आवडायचा तो… पण हिंमत नाही झाली माझी कधी.. गेल्याच महिन्यात त्याचा मेसेज आला होता… आणि काल त्याने विचारलं… ”

“अच्छा… मस्त आहे… मला पण भेटवं कधी तरी.. बघूया तरी कोण आहे… . ”

“हो नक्की भेटवीन.. तसही आपण एकत्रच तर असतो.. ”
नंतर नंतर दोघांचं contact कमी झालं. ती तिच्या life मध्ये busy आणि तिला disturb होईल या विचाराने तोही कधी स्वतःहून बोलायला गेला नाही. कधी तरी दोघे मेसेज वर बोलायचे.. पण ते तेवढ्यापुरतचं.. पहिल्या सारखं त्यांच्यात काही उरलं नव्हतं.. एके कालचे best friends.. पण आता फक्त फॉर्मलिटी म्हणून बोलणं व्हायचं.. तो सगळं नीट आहे असं भासवायचा आणि तिला काय बिघडलय ते कळत नव्हतं.

तसं बघायला गेलं तर दोघेही त्यांच्या जागेवर बरोबर होते. Relationship मध्ये आल्यावर priorities बदलतातच. फक्त आपण relationship आणि friendship दोन्ही कसं सांभाळतो यावर सगळं अवलंबून असतं.
काही दिवसांनी जाईला सुद्धा समजलं कि अमोलचं काहीतरी बिनासलय.. तो काही सांगत नसला तरी त्याच्या मनात काहीतरी आहे.. मग एक दिवस तिनेच पुन्हा विषय काढला..

“अमोल.. काय झालंय तुला ? बरेच दिवसांपासून मी बघतेय तू नीट बोलत नाहीये.. टाळतोयस मला.. असा नव्हतास तू… आधी किती काही सांगायचास मला.. माझं काही चुकलंय का??”

“नाही गं… काही पण असतं तुझं… मला काय होणार आहे.. मी मस्त मजेत आहे.. ”

“हे झालं लोकांना सांगायचं उत्तर… आता मला अगदी खरं सांग.. मी relationship मध्ये आली म्हणून तुला वाईट वाटलं का ??”

” हे बघ जाई… हे कधी न कधी तरी होणारच होतं. त्या बद्दल माझं काही म्हणणं नाहीये.. पण relationship मध्ये आल्यापासून तुझ्या life मधली माझी जागा माझी नाही राहिलीय. सगळं बदललंय जाई.. फक्त या change शी जमवून घ्यायला मला जरा जड जातंय.. बाकी काही नाही… तू माझं टेन्शन नको घेऊस.. माझा मी होईन ठीक काही दिवसांनी… ”

“असं नसतं अमोल.. तू माझ्यासाठी आधी जितका महत्वाचा होतास तितकाच आजही आहेस.. तुझी जागा धवल सुद्धा घेऊ शकणार नाही.

अमोल.. प्रेम हे कधी कमी जास्त नसतं.. ते सगळयांना साखरच मिळतं.. even आपल्या आई बाबांसुद्धा अशी भीती वाटत असते की मुलीचं लग्न झालं की तिचं आपल्यावरचं प्रेम कमी होईल.. पण प्रेम हे सगळयांना पुरून उरतं… ”

” हे सगळं बोलायला खूप सोपं आहे जाई… पण शेवटी सावरायला वेळ हा लागतोच ना… मी हि सावरेन यातून.. फक्त थोडासा वेळ लागतोय इतकंच… या

गोष्टीचा मी कधी विचारच नव्हता केला… हे सगळं इतकं अचानक घडलं कि काय करावं तेच मला समजत नव्हतं.. पण शेवटी relationship आणि friendship यामध्ये एका नात्याला वेळेनुसार झुकतं माप द्यावं लागतंच… या सर्व गोष्टींमुळे आपल्या friendship वर काही परिणाम होणार नाही एवढं फक्त आपल्याला बघायचंय.. तेवढं जर आपल्याला जमलं तर दोन्हीही नाती टिकून राहू शकतात… ”

# मैत्री

मैत्री म्हणजे काय?
आपल्या विचारात
सतत कोणाचं तरी येणं असतं
न सांगता समोरच्याला
आपल्या मनातलं कळणं असतं

कधीही न तुटणारं हे
दोन जीवांच नात असतं
संकटाच्या वेळी धावून जाणं
हे यातलं कर्तव्य असतं

पकडले गेल्यावर
मित्रांची नावे न सांगणे
हि आपली जबाबदारी असते
पकडल्या गेलेल्या मित्राची साथ
मात्र कधी सोडायची नसते

Gf/bf आल्यावर मैत्री न विसरणं
हि यातली unsigned deal असते
वहिनी जिजू चिडवणं
यातच तर खरी गंमत असते


मैत्री हि काही ठरवून करायची गोष्ट नसते
पण एकदा का मैत्री केली
कि मग मात्र ती आयुष्यभर निभावायची असते

मैत्री म्हणजे फक्त
Sharing नसतं
आपल्या मित्राच्या भावना
स्वतःच्या समजणं असतं

मैत्री म्हणजे नुस्तं good friend,best friend नसतं
आपण त्याच्या किती जवळचे आहोत
हे आपणचं समजून घ्यायचं असतं

मैत्रीत काही द्यायचं नसतं
काही घ्यायचं नसतं
ते फक्त एक विश्वासच नातं असतं
न सांगता समोरच्याला
भरभरून प्रेम देणं असतं

# Feeling ________




आजचा जो विषय आहे , तो खरं तर समाजातला काही गहन प्रश्न वगैरे नाही. पण सोशल नेटवर्किंगचा आपल्यावर इतका जबरदस्त प्रभाव आहे आणि त्या मुळेच कि काय आपण आपल्या चांगल्या वाईट भावना व्यक्त करण्यासाठीसुद्धा सोशल नेटवर्किंग चा वापर करत आहोत आणि याबाबत विचार करणे सुद्धा तितकेच महत्वाचे आहे

उदाहरण द्यायचं झालंच तर गेल्याच आठवड्यात माझं एका मैत्रिणीबरोबर भांडण झालं. आता मैत्री म्हटली की भांडण हि येतातच. पण राग आलाय हे


दाखवण्यासाठी तिने चक्क तिचा व्हाट्स अँप चा DP च काढून टाकला. नंतर लोकांना ( अर्थातच तिला हे मलाच दाखवून द्यायचं होतं) तिची कशी काळजी नाही ,ती कशी एकटी आहे आणि तिच्या आयुष्यातून कोणी मित्र अथवा मैत्रीण निघून गेल्यावर तिला कसा फरक पडत नाही वगैरे वगैरे दर्शवणारी स्टेटस आणि फोटो तिने ठेवले.

हि कुठली राग दर्शवण्याची पद्धत . छोटंसं भांडण झालं तर DP काढा आणि जर मोठं भांडण झालं तर सरळ block... . असे केल्याने यांना नक्की कसलं उच्च कोटीचं समाधान मिळतं हेच मुळी मला समजत नाही.

कधीकधी या सगळया गोष्टींची मला भारी गंमत वाटते. म्हणजे बघा ना... एखादयाबरोबर भांडण झालं की करा लगेच DP काढून टाका. एकदम दर्दभरी स्टेटस ठेवा म्हणजे मग लोक तुम्हाला विचारणार ... . नुसती सहानुभूती दाखवणार , तुम्ही कसे बरोबर आहेत हे सांगणार (चूक तुमची असेल तरीही)आणि मग शेवटी काय तर ज्याच्यामुळे तुम्ही DP काढलाय त्याने त्याची बाजू पटवून देण्याआधीच तो दहा बारा जणांच्या मनामध्ये व्हिलन झालेला असतो.

फेसबुकने तर हे काम अजूनच सोपं केलंय. नुसतं feeling sad... . इतकं टाकलं कि सर्व जगाला कळलेलं असतं कि तुमचं काहीतरी बिनासलंय. मग त्यावर likes. मुलींना आणखी likes. आणि मग त्यावर मिळणारे फुकटचे सल्ले. इतकंच नाही नुसतं feeling... . टाईप केलं की आपला सध्याचा मूड कसा आहे हे सिलेक्ट करण्यासाठी अनेक ऑपशन्सही येतात.

तुम्ही रागवा, रुसा.. त्या बद्दल माझा मुळीच आक्षेप नाही. पण आपला राग दाखवण्यासाठी व्हाट्स अँप , फेसबुकसारख्या कुबड्या वापरण्यापेक्षा समोरासमोर बोलून जर आपण आपले प्रॉब्लेम्स सोडवले तर प्रॉब्लेम्स लवकरही सुटतील आणि आपण ज्या व्यक्तीवर रागावलो होतो त्याच व्यक्तीने आपला राग घालवला याचा आपल्याला आनंदही वाटेल. बघा एकदा प्रयत्न करून... ...


कुणीतरी
कुणीतरी असावं
नेहमी समजून घेणारं
वाटलंच कधी एकटं,
तर न सांगता सोबत करणारं
कुणीतरी असावं
आपल्या आनंदात सहभागी होणारं
कितीही दुःखी असलो,
तरी खळखळवून हसवणारं
कुणीतरी असावं
Partners in crime म्हणून tag करता येणारं
पण जर चुकलो,
तर कान पकडून चूक दाखवणारं
कुणीतरी असावं
आपलं म्हणता येणारं
अडचणीत सापडलो,
तर न विचारता मदत करणारं
कुणीतरी असावं
नेहमी support करणारं
संपूर्ण जग जरी विरोधात असलं,
तरी आपल्या बाजूने उभं राहणारं
© प्रतिक प्रवीण म्हात्रे
www.pratikpravinmhatre.wordpress.com

# कोंडी...



“परेश... . रिझल्ट लागला वाटतं... . ”

” काय... ... . ”

रिझल्ट लागला एवढं नुसतं ऐकून परेशच्या चेहऱ्यावरचा रंगच उडाला. परेश तसा लहानपणापासूनच अभ्यासात हुशार होता. नेहमी फर्स्ट क्लास मिळवायचा. पण गेल्या सेमिस्टरपासून त्याला काय झालं कोणास ठाऊक... तो एकदम गप्प गप्प राहायला लागला. एरवी सगळयांशी मिळून मिसळून राहणारा मुलगा आता एवढा गप्प का राहतो याच सगळयांनाच आश्चर्य वाटत होतं.. त्याच्या मित्रांनी त्याला विचारलं देखील. पण त्याने कधी कोणासोबत शेअर केलं नाही. अगदी त्याचा

जवळचा मित्र अक्षय.. पण त्याला सुद्धा त्याने काही सांगितलं नव्हतं आणि हॉस्टेल ला राहत असल्यामुळे त्याचे आईवडील सुद्धा सोबत नव्हते..

“अक्षय… माझा पण रिझल्ट तूच बघ ना… ”
“तुझा रिझल्ट बघायची काय गरज आहे.. नेहमी सारखा फर्स्ट क्लास असणार तुला.. आमचेच पास व्हायचे वांदे असतात.. ”
“अरे नाही… तरी तूच बघ… ”
“बरं… बघतो.. मी येतो कॉलेज ला जाऊन.. रिझल्ट बघून फोन करतो.. पार्टी रेडी ठेव कळलं ना… . ”

थोड्याच वेळात अक्षयचा फोन आला. परेशला जे अपेक्षित होतं तेच घडलं होत.. नेहमी फर्स्ट क्लास मिळवणारा मुलगा चक्क नापास झाला होता. अक्षय त्याला समजावत होता पण परेशचं त्याच्या बोलण्याकडे अजिबात लक्ष नव्हतं. तो त्याच्याच विचारात गढून गेला होता.

परेश रूम वर एकटाच आहे म्हणून अक्षय सुद्धा कॉलेज मधून लवकरच घरी आला.. त्याने दरवाजा वाजवला.. आतून काही प्रतिसाद आला नाही.. त्याने थोडा वेळ प्रयत्न केला पण काहीच फायदा झाला नाही.. शेवटी त्याने होस्टेलच्या security ला सांगून दरवाजा तोडायला लावला. आणि आतलं दृश्य पाहून तो थबकलाच… परेश खाली जमिनीवर पडला होता.. त्याच्या तोंडातुन फेस येत होता. त्याने आणलेली विषाची बाटली बाजूलाच पडली होती… बिछान्यावर त्याच्या पाकिटातला आई बाबांचा फोटो पडला होता..

अक्षयने गडबडीने परेशच्या घरी फोन करून त्याला बरं नसल्याचं कळवलं.. सर्वांनी मिळून त्याला हॉस्पिटल मध्ये नेलं.. डॉक्टरांनी परेशला वाचवण्याचे खूप प्रयत्न केले .. पण शेवटी काहीच फायदा झाला नाही.. विष संपूर्ण शरीरात पसरल्यामुळे परेशची प्राणज्योत विझली होती.. ज्या कारणासाठी परेशवर हे पाऊल उचलण्याची पाळी आली होती ते कारण सुद्धा त्याच्यासोबतच निघून गेलं होतं.. परेशच्या आई वडिलांसाठी तर सर्व जगचं जणू संपलं होतं.. उरला होता तो फक्त आक्रोश… …

आपल्यावर असे किती तरी प्रसंग येतात.. पण अशा अपयशाने खचून न जाता आपण पुन्हा जिद्दीने उभं राहायला हवं. Depression मध्ये येऊन काही वेडंवाकडं पाउल उचण्यापेक्षा कोणाला तरी विश्वासात घेऊन आपला प्रॉब्लेम सांगितला तर त्यावर नक्कीच मार्ग निघू शकेल.. एकदा प्रयत्न तर करून बघा…

# आयुष्य...

लोक म्हणतात,
आयुष्य खुप छोटं आहे
पण अस बिलकुल नसतं
आपण जगायलाच उशिरा सुरवात करतो

सहज सोप्या आयुष्याला आपण
उगाच complicated करून टाकतो
जे आपल्याकड़े आहे
ते सोडून आपण भलत्याच्याच मागे लागतो

आपल्याला जे मिळालंय
त्यावर समाधान मानेल तो माणूस कसला
जे पाहिजे ते मिळालं की
त्याला अजून हवं असतं

आपल्या आयुष्याचा जास्ती वेळ
आपण आपल्याकडे काय नाही
ते मिळवण्यात घालवतो आणि ते मिळयाल्यावर
माणूस सुखी होइलच
याचीही शाश्वती नाही

आपल आयुष्य कसं जगावं
हे आपल्या हातात असतं
पण आपण उगाच स्वतःच्या

नशिबाला दोष देत असतो
आणि दुसऱ्यांच्या सुखी जीवनाचा हेवा करत बसतो

आयुष्य खुप सुंदर आहे
फक्त ते जगता आल पाहिजे
तेच लोकांना जमत नाही
आणि मग
लोक म्हणतात,
आयुष्य खुप छोटं आहे
पण अस बिलकुल नसतं
आपण जगायलाच उशिरा सुरवात करतो

# लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी...




एखादा दिवस साजरा करणं आजकाल किती सोपं होत चाललं आहे! सगळयांनी एकत्र मिळून थोडाफार दंगा केला, मोठ्या आवाजात गाणी लावली कि झालाच तो दिवस साजरा.. उद्या २७ फेब्रुवारी... जागतिक मराठी भाषा दिवस... संपूर्ण जगभरातील मराठी भाषिक हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करतात. पण आपण खरोखर आपली मातृभाषा टिकावी म्हणून प्रयत्न करतोय का ? आपल्या दैनंदिन जीवनात मराठीला योग्य दर्जा आपण देतोय का ? राज्यभाषा म्हणुन मान्यता प्राप्त झालेल्या आपल्या मराठी भाषेला आपण योग्य तो न्याय देतोय का ?

आपली भाषा- आपली मातृभाषा हीसुद्धा जागतिक भाषेच्या रेटय़ासमोर- प्रसारमाध्यमांच्या प्रभावाद्वारे तिच्या हक्कांपासून वंचित होते आहे. आपल्याच मातृभाषेपासून आपण दुरावत आहोत. भाषेच्या शुद्धतेला आपण पारखे होत आहोत. एकीकडे इंग्रजीसारख्या भाषेचा द्वेष तर करायचा नाहीच; किंबहुना त्याचे ज्ञानही मिळवायचे हे आव्हान आहेच.. त्याचबरोबरीने आपली भाषा समृद्ध

करायची, तिचा वापर-प्रसार करायचा आणि तिचे चिरंतनत्व अबाधित राखायचे हेसुद्धा मोठे आव्हान आहे.

मराठी भाषा बोलणाऱ्यांची एकूण लोकसंख्या साधारणतः ९,००,००,००० आहे. मराठी भाषा ९व्या शतकापासून प्रचलित आहे. मराठी भाषेची निर्मिती संस्कृतमधून निर्माण झालेल्या महाराष्ट्री प्राकृत व अपभ्रंश या भाषांपासून झाली आहे. याउलट मराठी आणि काही अन्य भारतीय भाषांच्यावर संस्कार होऊन संस्कृत भाषा बनली असेही काही विद्वान मानतात. जर इतका प्राचीन वारसा आपल्या मराठी भाषेला लाभला आहे तर मग तो वारसा टिकवण्यासाठी आपल्यालाच प्रयत्न करायला हवे . तुम्ही कधी दक्षिणेकडील राज्यांमध्ये गेलात तर तुम्हाला असं दिसेल कि त्या राज्यातली लोक हे त्यांच्याच भाषेत आपल्याशी बोलतात.. मग ती आपल्याला समजो वा न समजो... हिंदीचा वापर ते अगदीच कमी करतात. आणि आपण काय करतो... समोरच्याला आपली मराठी भाषा समजली नाही.. तर मग लगेच हिंदीत बोलायला सुरुवात... अरे कशाला ?? शिकू दे कि त्यांना पण जरा मराठी. हल्ली तर दोन मराठी माणसं एकत्र आली तरी हिंदी किंवा इंग्रजीमध्येच बोलतात. का?? मराठीत बोलण्याची लाज वाटते?? जर आपणच आपली भाषा बोलणं सोडून दिलं तर मग इतर लोकांकडून काय अपेक्षा करणार... ..

हल्ली अमेरिकेत असलेले मराठी भाषिक सुद्धा आपल्या मुलांना मराठी भाषा यावी म्हणून त्यांना अमेरिकेमध्ये मराठी भाषेच्या शिकवण्या लावतात.. आणि इकडे महाराष्ट्रातच आपण मराठीमध्ये बोलायला लाजतो. तुम्ही मराठी माध्यमांमधून शिक्षण घ्या किंवा इंग्रजी माध्यमांमधून... आपली मातृभाषा तर तुम्हाला यायला हवीच.. इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतलेल्या किती तरी जणांना साधं मराठी वाचताही येत नाही ही किती लाजिरवाणी गोष्ट आहे...

जेव्हा सरकारी कार्यालयात आपलं काही काम असलं तेव्हा बोलतोच ना आपण मराठीत.. का?? कारण मराठी माणसाशी मराठीत बोलल्यावर आपलं काम लवकर होतं.. मग इतर वेळी आपण मराठीत का बोलू नये... लोकलमध्ये जर कोणासोबत भांडण झालं तर बोलून बघा एकदा मराठीत... . जर तो परप्रांतीय असेल पण पुन्हा त्याच्या बापाची सुद्धा हिम्मत होणार नाही तुमच्याशी नडायची.. पण आपली समस्या अशी आहे की आपण मराठीत बोलायलाच बघत नाही... जिकडे बघावं तिकडे नुसतं हिंदी आणि इंग्रजी.. जर आपल्यालाच आपल्या मातृभाषेचा अभिमान नाही तर आपल्या पुढच्या पिढीला तरी तो कसा असणार...

आता मराठी भाषेने कात टाकली आहे... फिनिक्स पक्षाप्रमाणे आकाशात उंच झेप घेतली आहे. आणि या प्रवासात आपण तिला सोबत करणं हे आपलं आद्य कर्तव्य आहे.. आणि ते आपण सर्वांनी पार पाडायलाच हवं... तुम्ही हिंदीत बोला, इंग्रजीत बोला... पण जेव्हा शक्य आहे तेव्हा मराठीतच बोलण्याचा प्रयत्न करा... तेराशे वर्षांची परंपरा लाभलेल्या, देशात चौथ्या आणि जगात एकोणिसाव्या स्थानावर असलेल्या आपल्या या मराठी भाषेचा अभिमान बाळगा... . छत्रपती शिवाजी महाराजांच्या पद स्पर्शाने पावन झालेल्या या महाराष्ट्राचं मराठीपण जपा... .

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी

जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी |

धर्म , पंथ , जात एक जाणतो मराठी

एवढ्या जगात माय मानतो मराठी ||

धन्यवाद !!!

# लहानपण देगा देवा .. .

देवा मला पुन्हा एकदा लहान व्हायचयं
ओल्या मातीत खुप खुप खेळायचयं
कोणी ओरडल तर मुद्दाम रडायचयं
टब मध्ये आंघोळीसाठी हट्ट करायचय
देवा मला पुन्हा एकदा लहान व्हायचयं

चॉकलेट मिळण्यासाठी खोट खोट रडायचय
ते मिळाल्याच्या आनंदात हसायचय
पुन्हा एकदा मला शाळेत जायचय
देवा मला पुन्हा एकदा लहान व्हायचयं

शेवटच्या बेंच साठी पुन्हा एकदा भांडायचय
पुन्हा एकदा मला डब्बा वाटून खायचाय
लेक्चर्स बंक करुन मला प्रॅक्टीस साठी पळायचय
देवा मला पुन्हा एकदा लहान व्हायचयं

मित्राला त्याला आवडणाऱ्या मुलीच्या नावाने चिड़वायच
मला आवडणाऱ्या मुलीकडे चोरून बघायचय
पुन्हा मला रोज मधल्या सुट्टीची वाट बघायचिये
देवा मला पुन्हा एकदा लहान व्हायचयं

पुन्हा मला ट्रेन मधून प्रवास करायचय
धावणाऱ्या झाडांकडे मला कुतुहलाने बघायचय
प्रश्न विचारुन बाबांना भंडावून सोडायचय
देवा मला पुन्हा एकदा लहान व्हायचयं

# EGO

Leave the EGO,
otherwise
everyone would
leave you.

एक वेळ होती… ती whats app वर online येण्याची… तो वाट बघायचा.. त्याच्याकडे नेटपॅक होतं.. ती वायफाय वर online यायची.. ती परत offline जाईल, तिला reply दयायला उशीर होईल म्हणून त्याच नेट सतत चालू असायचं… तिचा मेसेज आल्यावर एका मिनिटाच्या आत त्याचा reply असायचा… आणि ती म्हणायची… . "संपूर्ण दिवस online असतोस… इतका कोणाशी बोलतोस… "

तिने स्वतःहून मेसेज करायची वाट न बघता तो नेहमी मेसेज करायचा… त्यांचं chat त्याच्याच मेसेज ने सुरु व्हायचं.. असे बरेच दिवस गेले… आणि शेवटी ego आड आलाच… नेहमी मीच मेसेज करतो… तिला माझी आठवण येत नाही का कधी??? कि मी मेसेज करतो म्हणून नाईलाजाने बोलते ती माझ्याशी… मलाच

गरज आहे का तिची ??? तिला कधी वाटत नाही का स्वतःहून काहीतरी शेअर करावं असं… आता तिनेच मेसेज करू दे… मी नाही करणार… झालं… .. एक दिवस गेला… दोन दिवस गेले… . आठवडा गेला… महिना सरत आला… तरी तिचा काही मेसेज नाही… या महिन्याभरात त्याची अवस्था सुद्धा काही फार चांगली नव्हती.. बऱ्याचदा त्याने मेसेज type केला… send दाबायच्या आधीच पुन्हा ego आड यायचा आणि तो मेसेज delete करायचा…


आणि एक दिवस दोघे कॉलेज मध्ये समोरासमोर आले.. नेहमीच्या गळाभेटीची जागा एका जबरदस्तीच्या smile ने घेतली होती… आणि त्या दिवशी शेवटी त्यालाच राहवलं नाही.. त्यानेच मेसेज केला… .

" मी मेसेज केला नाही तर तू स्वतःहून करणारच नाहीस ना कधी… तुला काही म्हणजे काहीही वाटत नाही ना माझ्याबद्दल… इतके दिवस नाईलाजास्तव बोलत होतीस का माझ्या बरोबर… एकदा सांगून तरी बघायचं होतंस.. तूझ्या आयुष्यातून कायमचा निघून गेलो असतो मी… तुला माझी गरज नव्हती आणि मी उगाच वेड्या सारखा तुझी काळजी करत बसायचो… "

" नाही रे… . उलट या काही दिवसात मला खरंच खूप गरज होती तुझी… . बाबा गेले… आणि त्या आई अजून त्या धक्क्यातून सावरली नाहीये… मला खुप आठवण येत होती तुझी… सारखं वाटत होतं की तुला भेटावं आणि तुझ्या खांद्यावर डोक ठेवून अश्रूंना वाट मोकळी करून द्यावी… पण नेहमी तूच मेसेज करायचास ना मला.. मी नाही केला तरी.. आणि तू केलाच नाहीस… मला वाटलं कि तुला आता माझी आठवण येत नसेल… . मला अनेकदा असं वाटलं.. कि तुझ्याशी बोलावं.. पण मग मनात विचार यायचा कि उगाच का आपण त्याच्या आयुष्यात ढवळाढवळ करावी… त्याचं आयुष्य छान चाललंय तर त्याला उगाच आपलं टेन्शन का

सांगावं… .. मला खरंच खूप गरज होती रे तुझी… . पण तू नव्हतास माझ्या सोबत… ”

या गोष्टीचा शेवट काय व्हायचा तो होईल… पण खरंच या ego मुळे आपण अनेकदा आपली हक्काची माणसं गमावतो.. जर तो थोडासा बाजूला ठेवला तर आयुष्य किती सुंदर होऊ शकतं…


मुंबई लोकल
आमची मुंबई लोकल.....
गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत सर्वांच्याच खिशाला परवडणारी
डहाणू पासून चर्चगेट आणि सीएसटी पासून पनवेल/कसारा
अशी दोन टोकं परस्परांना जोडणारी
ट्रॅक क्लिअर असला की वाऱ्याशीही स्पर्धा करणारी
पण पावसाळा आला की मग मात्र थोडीशी गोगलगाईसारखी चालणारी
आठवड्यातून एका बंधनमुक्त होण्यासाठी ओव्हरहेड वायर तोडणारी
सर्व चाकरमान्यांना ऑफिसला लेट जाण्यासाठी नेहमीच एक हक्काचं कारण देणारी
रात्री एक वाजेपर्यंत मुंबईकरांच्या सेवेसाठी न दमता धावणारी
आणि सकाळी तीन वाजता फुलविक्रेत्यांसाठी लवकर उठणारी
कधी कधी थोडीशी उशिरा येऊन स्वतःच महत्व जाणवून देणारी
सर्व मुंबईकरांना वेळेवर पोहोचण्याची सवय लावणारी
कितीही गर्दी असली तर सर्वांना आपल्यात सामावून घेणारी
कुठलाही भेदभाव न करता सर्वांना त्यांच्या इच्छित स्थळी पोहोचवणारी
कोणी नवखा माणूस जरी असला तरी त्याला सांभाळून घेणारी
मुंबईकरांच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग असलेली आणि
मुंबईची लाईफ लाईन म्हणून ओळखली जाणारी
आमची मुंबई लोकल......
- प्रतिक प्रवीण म्हात्रे



# प्रतिक प्रवीण म्हात्रे,

आगाशी, म्हात्रेवाडी, 'साई प्रतिक निवास',
पोस्ट ऑफिस समोर
विरार पश्चिम, तालुका /जिल्हा -पालघर
४०१३०१

मोबाईल - ८८८८१९८८५०
ईमेल - infopratikmhatre@gmail. com

पर्सनल ब्लॉग - www. pratikpravinmhatre. wordpress. com

जन्म १४ जून १९९५
बालपण विरार येथील आगाशी येते गेले. शालेय शिक्षण तिथेच पूर्ण झाले. त्यानंतर श्री भगूबाई मफतलाल पॉलिटेकनिक विलेपार्ले येथे इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स या विषयात डिप्लोमा पूर्ण केला. नुकतीच विद्यालंकार इन्स्टिट्यूट ऑफ टेकनोलॉजि मधून इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकॉमुनिकेशन ची डिग्री प्राप्त केली आहे.

लहानपणापासूनच मला वाचनाची आवड आहे. त्यातही ऐतिहासिक कथा आणि कादंबऱ्या मला विशेष प्रिय आहेत. आतापर्यंत मी श्रीमान योगी, पावनखिंड, स्वामी, ज्ञानेश्वरी,मृत्यूनंजय, छावा, रामायण, महाभारत, युगंधर अशी अनेक पुस्तके वाचली आहेत. रणजित देसाई आणि शिवाजी सावंत हे माझे आवडते लेखक आहेत.

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

“Language is the blood of the soul into which thoughts run and out of which they grow. ”

– Oliver Wendell Holmes


www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा.

हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे 7710980841किंवा नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.